वर्ष १२ वे

अंक ३ रा

**सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण**

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह,**

मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे-३३

**रविवार दि. २२.७.२०१२ रोजी सकाळी १० वाजता**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

**(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- राहिलेल्या बांधकामाचा अपेक्षित खर्च रु.६० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**ऑगस्ट-सप्टें.-ऑक्टो.-नोव्हेंबर २०१२**

फक्त सभासदांकरिता

(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ५००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून ८० विद्यार्थ्यांची राहण्याची सोय झाली आहे.**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : ७ जुलै, २०१२ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २२.०७.२०१२** रोजी **स.११ वा. पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह, मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३** येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.२४.०७.२०११ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०११-२०१२ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०१२-२०१३ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २०१२-२०१३ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.
२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.३० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.१७.०७.२०१२** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**❊ आपले नम्र ❊**

| | | | |
|---|---|---|---|
| **हौसाराम घोडके**<br>कार्याध्यक्ष | **डॉ.बाळासाहेब बांडे**<br>अध्यक्ष | **इंजि.विजयकुमार ठुबे**<br>अध्यक्ष, बांधकाम समिती | **मधुकर शिरोळे**<br>उपाध्यक्ष |
| **सुनील पोटे**<br>सेक्रेटरी | **प्रा.गोरक्ष जगताप**<br>सहसेक्रेटरी | **बाजीराव जगदाळे**<br>कार्यवाहक | **अशोक वाबळे**<br>सहकार्यवाहक |

**सदस्य :- सखाराम गागरे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, तारकराम झावरे, बाळासाहेब येणारे.**

**❊ कार्यक्रमाचे स्थळ ❊**

**रविवार दि.२२.०७.२०१२ रोजी सकाळी १० वा.**
**पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह, मंगल नगर, वाकड रोड,**
**डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११ ०३३. संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि.२२ जुलै २०१२** रोजी **सकाळी १०** वाजता **पारनेर तालुका मित्र मंडळ विद्यार्थी वसतिगृह, मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३** येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

**❊ अध्यक्ष ❊**

**मा.विकास देशमुख**
जिल्हाधिकारी, पुणे

**❊ प्रमुख पाहुणे ❊**

**मा.सौ.मोहिनीताई लांडे**
महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**मा.प्रकाश ढुबे**
मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा जिल्हा परिषद

**❊ प्रमुख उपस्थिती ❊**

**मा.विश्वनाथ कोरडे**
जिल्हा परिषद सदस्य, पारनेर तालुका

**मा.सौ.मंदाकिनीताई भोसले**
जिल्हा परिषद सदस्या, पारनेर तालुका.

**मा.सौ.उषाताई कळमकर**
नगरसेविका, पुणे महानगरपालिका

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**❊ आपले नम्र ❊**

**हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष

**डॉ.बाळासाहेब बांडे**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ढुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप**
सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे**
कार्यवाहक

**अशोक वाबळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, तारकराम झावरे, बाळासाहेब येणारे.**

**❊ कार्यक्रमाचे स्थळ ❊**

**रविवार दि.२२.०७.२०१२ रोजी सकाळी १० वा.**
**पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह, मंगल नगर, वाकड रोड,**
**डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११ ०३३. संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# संपादकीय

प्रिय सभासद,

दिनांक ३ डिसेंबर १९७९ रोजी **कै. वामन शंकर भोंग गुरूजी** यांनी आपल्या संस्थेची स्थापना केली. त्यानंतर समाजातील सर्वच स्तरातील सभासदांच्याकडून मिळणाऱ्या योगदानावर मंडळाने अतिशय पारदर्शकपणे प्रगती केली. म्हणता म्हणता ३०-३२ वर्षे लोटली अन् एक दिमाखदार विद्यार्थी वसतिगृह पुणे शहरात उभे राहीले. इतर समाजकार्य करता करता उराशी बाळगलेले स्वप्नही मंडळाने प्रत्यक्षात उतरविले ते वसतिगृह सुरु करण्याचे ! तेही स्वतःच्या मालकीचे व स्वतःच्या जागेवर ! आता त्यामध्ये सिंहाचा वाटा आहे तो **भोंग गुरूजी** यांच्यानंतर **श्री.हौसाराम घोडके** यांचाच! त्यांच्या अथक कष्ट करण्याच्या प्रयत्नातून पारनेर तालुक्यातील मंडळींनी देणगीच्या माध्यमातून मंडळास अतिशय बहुमोल मदत केली आहे. हीच खरी पारदर्शक कामकाजाची पावती आहे. त्याचे खरे श्रेय **श्री.हौसाराम घोडके** यांनाच आहे. **अद्यापही मुलींच्या वसतिगृहाचे त्यांचे स्वप्न पुरे करावयाचे आहे.** परंतु आता वयाची सत्तरी त्यांनी ओलांडली आहे व आपला उत्तराधिकारी आत्ताच तयार करावा असे त्यांचे मत आहे. कार्यकारीणीच्या मागील बैठकीमध्येही त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. त्यांच्या या इच्छेचा आदर करीत कार्यकारणी आता कात टाकू पाहतेय! सर्व कार्यकारीणीने श्री.हौसाराम घोडके यांचा उत्तराधीकारी म्हणून **डॉ.बाळासाहेब बांडे** यांची निवड सुचीत केली आहे. तथापी डॉ.बांडे यांनी नवीन अध्यक्ष म्हणून सूत्रे हाती घेतल्यानंतरही श्री.घोडके यांचे मार्गदर्शन व सक्रीय सहभाग आज आहे तसाच राहील असे श्री.घोडके यांनी जाहीर केले आहे. असे व्यक्तिमत्व सध्याच्या काळात दुर्मीळच! म्हणूनच श्री. घोडके यांचा सर्व पारनेरकरांना अभिमानच वाटतो. श्री.घोडके यांनी आतापर्यंत दिलेल्या योगदानाबद्दल मी त्यांना आपल्या सर्वांतर्फे सलाम करतो. **श्री.घोडके यांच्या शतायुषासाठी आपणा सर्वांच्या शुभेच्छा!** तसेच **डॉ.बाळासाहेब बांडे यांनाही त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा !**

मागील अंकामध्ये देणगीदारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ती जास्तीत जास्त वाढावी, अशी अपेक्षा करतो. त्या योगदानातूनच आपल्याला **मुलांच्या वसतिगृहातील वरील दोन मजले व मुलींचे वसतिगृह बांधावयाचे आहे.** सर्व बंधु-भगिनींना कार्यकारीणी मंडळाकडून नम्र विनंती करण्यात येते की, **आपण या उज्वल भवितव्यासाठी मंडळास भरघोस मदत करावी.**

श्री.घोडके यांच्या पुढाकाराने मागील तीन महिन्यापासून **वस्त्र बँक** सुरू झाली आहे. या बँकेस खुप चांगल्या प्रकारे सभासदांकडून प्रतिसाद मिळत आहे. ही वस्त्र बँक सुरू केल्याबद्दल श्री.घोडके यांचे अभिनंदन व आभारही! **आपणही आपल्या घरातील चांगले परंतु आपल्या दृष्टीकोनातून कालबाह्य झालेले कपडे देऊन गरजू देशबांधवांना मदत करावी असे आवाहन करतो.**

नवीन शालेय वर्षाची सुरूवात होत असल्याने इ.१०वी व १२वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा देतो. धन्यवाद !

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | कार्याध्यक्ष | ९४२०६९६७९० | श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | अध्यक्ष | ९८२२०५१५९३ | श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ | श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ | श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ | श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ | श्री.तारकराम झावरे | सदस्य | ९४२३७८८९१७ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० | श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ | श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |

# वसतिगृह प्रवेश

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे सुरु झाले असून प्रवेशासाठी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**१) श्री.बाजीराव जगदाळे - मो. ९०११०२१४३०** **२) श्री.मधुकर हौशाभाऊ शिरोळे - मो. ९९२२१६६१२५**

# विद्यार्थी गौरव - दहावी



कु. ऐश्वर्या चंद्रशेखरन
रा. पुणे
९८.२%



कु. विजयालक्ष्मी ज्ञानदेव खोसे, रा.पाडळी दर्या
९७%



कु. श्वेता बाळासाहेब बांडे
रा. टाकळी ढोकेश्वर
९६.५%



कुमार शुभम गोरक्ष जगताप, रा.बाबुर्डी
९५%



कुमार मनिष संजय बागडे
रा.हंगे
९४%



कुमार अनुप पोपट तांबडे,
रा. तिखोल
९३.५%



कुमार तेजस मोहन औटी
रा.पारनेर
९१%



कु.प्राची बाबाजी कदम
रा.पिंपरी जलसेन
९०.६०%



कुमार अनुज पोपट तांबडे
रा. तिखोल
९०.२०%



कुमार सुरज अभिमान तराळ, रा. तराळवाडी
९०%

कुमार किशोर भाऊसाहेब साबळे, रा. रुई छत्रपती
८९.२७%



कु. अंजली सुरेश ठाणगे
रा. तिखोल
८९%



कु. सुचेता सुनिल सालके,
रा. जवळे
८९.१४%



कु. कोमल गोरक्ष तिकोणे,
रा.पाडळी दर्या
८८.५%




कु.पुजा सोपान खोसे
रा.पाडळी दर्या
८७.२७%

कु.ऐश्वर्या राजेंद्र टोणगे
रा. कोहोकडी
८७%


कु.सुधांशी अशोक सालके,
रा. जवळे
८७%



कुमार शिवहरी सुरेश पुरी
रा. बाबुर्डी
८६%



कु. कोमल कैलास आवारी,
रा. रांधे
८३%



कु. किर्ती पंढरीनाथ दिघे
रा. वडझीरे
८१%

कु. वर्षा भाऊसाहेब साबळे
रा. रूई छत्रपती
८१%



कु.मृणाल संजय झावरे,
रा. भोंद्रे
८०.५%



कु.कोमल कैलास दळवी,
रा. हंगे
७९%

कु.प्रियंका सखाराम औटी,
रा. पारनेर
७७%

# विद्यार्थी गौरव

## इ.१०वी



कुमार ऋषीकेश दिलीप जाधव, रा.वेसदरे
७३%



कुमार लवकेश संभाजी शेंडकर, लोणी मावळा
७२%



कुमार हरीओम साहेबराव आंधळे, रा. कर्जुले हरेश्वर
७१%

## इ.१२वी सायन्स

कुमार अभिजीत देवराम पिंपरकर, रा.चिंचोली
९५%



कु.प्रतिक्षा मच्छींद्र खोडदे, रा.गांजीभोयरे
८९.६७%



कु.धनश्री भास्कर चेमटे रा.वासुंदे
८७.५०%



कु.अपूर्वा अजित कर्नावट, रा.खडकवाडी
८६.००%



कु.प्राची दशरथ दातीर, रा.कासारे
८३%



कुमार मिहीर मिलींद भालेराव रा.पानोली
८२.५०%



कुमारी स्वाती बाळासाहेब जपे, रा. विरोली
८२%

कु. वर्षा भाऊसाहेब साबळे रा. रूई छत्रपती ८१.००%

## इ.१२वी सायन्स



कु.मुग्धा वसंतराव पंदरकर, रा.पिंपळगाव पिसा
८०.००%



कु.निकीता शरद ठुबे रा.कान्हूर पठार
७९.००%



कु.रोशनी लक्ष्मण उर्फ विलास शिंदे, रा.पानोली
७८.५०%



कु.प्राजक्ता मुरलीधर जवक रा.रांजणगाव मशिद
७८.००%



कु.प्रतिक्षा साहेबराव मोरे, रा.वडझिरे
७७%



कु.अंकिता संभाजी गोरडे रा.लोणी मावळा
७६%



कुमार अमेय पांडुरंग गायकवाड रा.जवळे
७३%

कु.सायली बाळासाहेब गोरे, रा. किन्ही
७३%



कु. योगिनी संभाजी शेंडकर रा.लोणी मावळा
७२%



कु.प्राजक्ता भास्कर खोसे, रा.पाडळी दर्या
७२%

कुमार आदित्य मधुकर आवारी, रा. रांधे
७२%



कु. दिप्ती सोमनाथ मापारी रा. राणेगण सिद्धी
७०%

## इ.१२वी कॉमर्स



कु.तेजल राजेंद्र लटांबळे रा.पिंपळनेर ७८%

## स्कॉलरशिप




❋ **कु. प्रतिक गोकुळ झावरे**, रा.गारगुंडी हा माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये **अहमदनगर जिल्हा शहरी विभागात गुणवत्ता यादीत पहिला** आला.



❋ **कु. अजित भास्कर हांडे**, रा. पारनेर हा माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये **अहमदनगर जिल्हा शहरी विभागात गुणवत्ता यादीत सहावा** आला.

## पदवीधर




❋ **कु.स्नेहल भास्कर खोडदे** रा.किन्ही हीस **डिप्लोमा इलेक्ट्रॉनिक्स व टेलीकम्युनिकेशन मध्ये ८६ टक्के** गुण प्राप्त झाले असून तिला बी.ई.च्या दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळाला.

## कला-क्रीडा



❋ **कु.स्मिता नानासाहेब मापारी**, रा.राळेगण सिद्धी ही हॉकी व ज्युडो मध्ये राष्ट्रीय खेळाडू असून आतापर्यंत तिने **राष्ट्रीय स्तरावर १३ वेळा प्रतिनिधीत्व** केले आहे. तसेच ज्युडो मध्ये तिला **राष्ट्रीय स्पर्धेमध्ये कास्य पदक** मिळालेले असून ती सध्या **एम.कॉम.** करीत आहे.

## निधन वार्ता



❋ **दिनकर दगडू दिवटे**, वय ८० वर्षे, रा.रूई छत्रपती यांचे **दि.२९.०३.२०१२** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र पांडुरंग यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

❋ **सौ. गुलाबबाई खुशालचंदजी शिंगवी**, वय ७३ वर्षे, रा.कान्हुर पठार, यांचे **दि. ०९.०४.२०१२** रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे पती श्री.खुशालचंदजी शिंगवी यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.






❋ **महेश बबनराव आढाव**, वय ४० वर्षे, रा.सांगवी सुर्या, यांचे **दि.२८.०४.२०१२** रोजी निधन झाले. ते नायब तहसिलदार या पदावर होते.



❋ **सौ.जाईबाई प्रमोद सोबले**, वय ६३ वर्षे, रा.जामगाव यांचे **दि.२५.०५.२०१२** रोजी निधन झाले.



❋ **रघुनाथ विठोबा गायकवाड**, वय ८२ वर्षे, रा.जवळे यांचे **दि.१२.०६.२०१२** रोजी निधन झाले.



❋ **नुरमहंमद सगुभाई पठाण**, वय ८८ वर्षे, रा. पिंपरी जलसेन यांचे **दि.२०.०६.२०१२** रोजी निधन झाले.

❋ **श्रीमती अनुसया दगडू घावटे**, वय ९८ वर्षे, रा.राळेगण सिद्धी यांचे दिनांक **१२.०५.२०१२** रोजी निधन झाले.

# रक्तदान शिबीर

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे व के.ई.एम. हॉस्पिटल ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२.०७.२०१२ रोजी दुपारी २ ते ५ या वेळात भव्य रक्तदान शिबीर आयोजित केले आहे.**

**तरी सदर शिबीरामध्ये सर्व सभासद, हितचिंतकांनी सहभागी होऊन रक्तदानाचे पुण्यकर्म करावे ही नम्र विनंती.**

**स्थळ :- पारनेर तालुका मित्र मंडळ वसतिगृह, पुणे.**
**दिनांक व वेळ :- २२.०७.२०१२ रोजी दुपारी २ ते ५**

**-: अधिक माहितीसाठी संपर्क :-**

**डॉ. बाळासाहेब बांडे - ९८२२०५१५९३** **श्री. मधुकर शिरोळे - ९९२२१६६१२५**
**श्री. बाजीराव जगदाळे - ९०११०२१४३०** **श्री. सुनील पोटे - ९२२६९२१०८८**

## ग्रामस्थ गौरव



❊ **श्री. गोकुळ दादाभाऊ झावरे,** रा. गारगुंडी यांना महाराष्ट्र शासनातर्फे दिला जाणारा **राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार** जाहीर झाला आहे. हा पुरस्कार सकारात्मक शैक्षणिक व सामाजिक कामाबद्दल दिला जातो.



❊ **श्री.तुषार बाळासाहेब जगदाळे,** रा. बाभुळवाडे यांनी कॉलेज ऑफ इंजिनियरींग (सीएमई, दापोडी) मधून तांत्रिक व लष्करी प्रशिक्षण कॅडेट ट्रेनींग विंग मधून पूर्ण केले. **एकूण २४ छात्रांच्या तुकडीच्या दीक्षांत संचालनामध्ये त्यांना उत्कृष्ट परफॉर्मन्स बद्दल सुवर्णपदक** बहाल करण्यात आले. त्यांची **लष्करामध्ये लेफ्टनंट** म्हणून नेमणूक झाली.



❊ **कु.सिता अशोक शेळके,** रा.भोंद्रे, ही बी.ई. मेकॅनिकल असून ती लष्करात दाखल होण्यासाठीची **एसएसबी सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाची परीक्षा** पास झाली व टेक्नीकल एन्ट्रीमधून महाराष्ट्रातून तिची एकटीचीच निवड झाली. **पारनेर तालुक्यातून लष्करामध्ये दाखल होणारी ती पहिलीच मुलगी.** ट्रेनिंगनंतर सैन्यदलात तिची **लेफ्टनंट** म्हणून नेमणूक करण्यात येईल.



❊ **कु. दिपीका पारुनाथ झावरे,** रा.गारगुंडी ही **सनदी लेखापाल (सी.ए.)** च्या अंतिम परीक्षेत पास झाली.



❊ **श्री. प्रल्हाद ज्ञानदेव खोसे,** रा. पाडळी दर्या यांना नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये **मुख्य बाजार व परवाना अधिकारी** (सहाय्यक आयुक्त) म्हणून **पदोन्नती** मिळाली. १९९३ मध्ये त्यांनी स्वच्छता निरीक्षक म्हणून नोकरीची सुरुवात केली. परंतु स्वतःची कर्तबगारी, प्रामाणिकपणा व जनसंपर्कामुळे ते या पदापर्यंत पोहोचले. त्यांना यापूर्वी **'गुणवंत कामगार'** या पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे. तसेच त्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये संत गाडगेबाबा स्वच्छता अधिकारी या पदावर काम केले आहे. सामाजिक कार्याची त्यांना आवड आहे. **श्री. संत ज्ञानेश्वर संस्था,** पाडळी दर्या चे ते **उपाध्यक्ष** आहेत. तसेच **नवी मुंबई कर्मचारी व अधिकारी पतसंस्थेचे ते संस्थापक, प्रमोटर व संचालक** आहेत.

## अभिनंदन



❊ **कु.ईश्वरी अनंतराव मातेरे,** वय १२ वर्षे, रा. बाभुळवाडे ही इयत्ता ७वी मध्ये शिकत असून तिने २०१० मध्ये ऑल इंडिया लॉन टेनिस असोसिएशन तर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. सदर स्पर्धा सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, पुणे, पाचगणी या ठिकाणी झाल्या. तिला रायझींग स्टार लॉ कॉलेजतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये **पहिले बक्षिस** मिळाले. तसेच पुना क्लब टेनिस अकॅडमीमध्ये **दुसरे बक्षिस** मिळाले. हॉटेल रिव्हाईन, हॉटेल फिचर स्टार, पाचगणी मध्ये झालेल्या **ज्युनियर चॅम्पियनशिपमध्ये दुसरे पारितोषिक** मिळाले. **ऑल इंडिया रँकींगमध्ये तिचा ३०० मुलींमध्ये ६० वा नंबर** आहे. पुढील तयारीसाठी ती **इलाईट टेनिस अकॅडमी** च्या निमंत्रणानुसार **स्पेनमध्ये** २ महिन्याच्या ट्रेनिंगसाठी व इंटरनॅशनल मॅचेस खेळण्यासाठी दि.०१.०७.२०१२ रोजी **स्पेनला रवाना झाली.**



❊ **डॉ. सुधीर शिवाजी लामखडे,** रा. निघोज यांनी एम.बी.बी.एस. बरोबरच **डी.आर्थो. व डी.एन.बी.आर्थो.** या परीक्षेत उत्तम यश मिळविले आहे.



### श्री रामदास गारकर यांना राहुरी कृषी विद्यापिठाची पीएच. डी.

मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव येथील वरीष्ठ संशोधन सहाय्यक **श्री. रामदास मारुती गारकर** यांना वनस्पती शरिरक्रिया शास्त्र या विषयात महात्मा फुले कृषी विद्यापिठाची **पीएच. डी.** प्रदान करण्यात आली आहे. **पाण्याच्या ताणाचा ऊस पिकाची शरिरक्रिया, जैव रासायनिक क्रिया आणि रेणविय पातळीवर होणारा परिणाम** हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. महात्मा फुले कृषी विद्यापिठातील वनस्पतीशास्त्र प्रमुख डॉ. रावसाहेब भारुड यांचे तसेच डॉ. शरद माटे, डॉ. आर. एम. नाईक, डॉ.अनिल काळे, आणि डॉ. ए.जे. शिवगजे यांचेही त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. श्री रामदास गारकर हे बाबुर्डी गावचे रहिवासी असून ते सध्या **मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव** येथे **वरीष्ठ संशोधन सहाय्यक** या पदावर कार्यरत आहेत. मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र पाडेगाव येथून प्रसारित झालेल्या **को ८६०३२, को ९४०१२ आणि कोएम ०२६५** या ऊसाच्या जातींच्या निर्मितीमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग आहे.

# नांदा सौख्य भरे

❁ श्री.रामचंद्र लक्ष्मणराव ठुबे, रा.पारनेर यांची सुकन्या **सौ. योगिता** व कै.सुदाम मारुती फापाळे, रा.ओतुर, ता.जुन्नर यांचे सुपुत्र **चि.विवेक** यांचा शुभविवाह **दिनांक २९.०३.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.ठुबे यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

❁ श्री.एकनाथ गोपाळराव गुंजाळ, रा.वडगाव आमली यांची सुकन्या **सौ.मेघा** व श्री.विठ्ठलराव यशवंत नरवडे रा.खातगाव, ता.नगर यांचे सुपुत्र **चि.संदिप** यांचा शुभविवाह **दिनांक १४.०४.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.गुंजाळ यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

❁ श्री.सुभाष आश्रुजी आग्रे, रा.अळकुटी यांची सुकन्या **सौ.किर्ती** व श्री.सुरेश भाऊ काळे, रा.बोरी बु.।। ता.जुन्नर यांचे सुपुत्र **चि.प्रमोद** यांचा शुभविवाह **दिनांक १५.०४.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.आग्रे यांनी मंडळास **रू.११,०००/-** देणगी दिली.

❁ श्री.बबनराव भिवाजी डेरे, रा.पाडळी आळे यांचे सुपूत्र **डॉ.अविनाश** व श्री.मारुती रखमाजी डुंबरे, रा.ओतुर, ता.जुन्नर यांची सुकन्या **डॉ.हेमलता उर्फ अमृता** यांचा शुभविवाह **दि.१६.०४.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.डेरे यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

❁ श्री.भास्कर रामचंद्र राऊत, रा.राऊतवाडी यांची सुकन्या **डॉ.सौ.योगिनी** व श्री.अर्जुन हरिभाऊ कोकाटे, रा.सोमाटणे, ता.पाथर्डी यांचे सुपुत्र **चि.डॉ.वसंत** यांचा शुभविवाह **दि.१६.०४.२०१२** रोजी संपन्न झाला.

❁ श्री.दत्तात्रय बाबुराव मापारी, रा.राळेगण सिद्धी यांची सुकन्या **सौ.ज्योती** व श्री.सुकदेव सोपानराव पवार रा.उखलगाव ता.श्रीगोंदा यांचे सुपुत्र **चि.प्रविण** यांचा शुभविवाह **दिनांक २२.०४.२०१२** रोजी संपन्न झाला.

❁ श्री.बाळासाहेब मार्तंड ठुबे, रा.कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ.सुरेखा** व श्री.काशिनाथ मारुती नरवडे रा.आंबी दुमाला, ता.संगमनेर यांचे सुपुत्र **चि.प्रशांत** यांचा शुभविवाह **दि.२४.०४.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री. संदिप बाळासाहेब ठुबे यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

❁ श्री.बाळासाहेब सदाशिव आहेर, रा.पळसपुर यांचे सुपुत्र **चि.राहुलकुमार** व श्री.बळीराम दुधाराम लाटे, रा.बेलुरा, जि.बीड यांची सुकन्या **सौ.प्रिती** यांचा शुभविवाह **दि.२५.०४.२०१२** रोजी संपन्न झाला.

❁ श्री.शिवाजीराव दगडू लामखेडे, रा.निघोज यांचे सुपुत्र **चि.गोरख** व श्री.बबनराव पदुजी जाधव, रा.निघोज यांची सुकन्या **सौ.संगिता** यांचा शुभविवाह **दि.०१.०५.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.लामखडे यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

❁ श्री.विजय सर्जेराव देशमुख, रा.पारनेर यांची सुकन्या **डॉ.सौ.प्रियांका** व कर्नल व्यंकटराव पांडुरंग संकपाळ, रा.जामगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा यांचे सुपुत्र **चि.विवेक** यांचा शुभविवाह **दि.०५.०५.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.देशमुख यांनी मंडळास **रू.२,१००/-** देणगी दिली.

❁ श्री.सुदामराव दिनकर दिवटे, रा.रूई छत्रपती यांचे सुपुत्र **चि.शाम** व श्री.अर्जुन साहेबराव चौधरी रा.बारामती यांची सुकन्या **सौ.धनश्री** यांचा शुभविवाह **दि.०७.०५.२०१२** रोजी संपन्न झाला.

❁ श्री.रभाजी भिमाजी मातेरे, रा.बाभुळवाडे यांची सुकन्या **सौ.शिल्पा** व श्री.विजय रामचंद्र ठाकूर रा.मठ, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग यांचे सुपुत्र **चि. विशाल** यांचा शुभविवाह **दि.१३.०५.२०१२** रोजी संपन्न झाला. श्री.मातेरे यांनी मंडळास **रू.२,०००/-** देणगी दिली.

❁ श्री.अनंत सुखदेव जाधव, रा.वेसदरे यांची सुकन्या **सौ.प्रियंका** व श्री.तुकाराम यल्लप्पा सासुलकर रा.नेसरी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे सुपुत्र **चि.अजित** यांचा शुभविवाह **दि.१३.०५.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.जाधव यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

❁ श्री.दामोदर लक्ष्मणराव बालवे, रा.म्हसने यांचे सुपुत्र **चि.प्रताप** व श्री.चिंतामण मुरलीधर काळे रा.बोरी खुर्द, ता.जुन्नर यांची सुकन्या **सौ.सिमा** यांचा शुभविवाह **दि.२२.०५.२०१२** रोजी संपन्न झाला.

❁ श्री.बाळासाहेब रखमाजी रोहोकले, रा.भाळवणी यांची सुकन्या **सौ.अनुराधा** व कै.देवराम महादू दिघे, रा.बुरूंजवाडी (शिक्रापुर) ता. शिरुर यांचे सुपुत्र **चि.सचिन** यांचा शुभविवाह **दि.०५.०६.२०१२** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.रोहोकले यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❁ कै.मुकुंद बबनराव आढाव, रा.सांगवी सुर्या यांची सुकन्या **सौ.स्नेहल** व श्री.सुधाकर बाबुराव चव्हाण यांचे सुपुत्र **चि.शाम** यांचा शुभविवाह **दि.१५.०६.२०१२** रोजी संपन्न झाला.

# आपण असे केले तर

❊ **सौ.चित्रा आप्पासाहेब बोरुडे,** रा.पिंपरी जलसेन यांनी त्यांचे सुपुत्र चि.अभिजीत याच्या दि.१२.२.२०१२ च्या शुभविवाहानिमित्त मंडळास **रू.५,००१/-** देणगी दिली.



❊ **सौ. निर्मला अशोक घोरपडे,** रा.चिंचोली यांनी त्यांच्या दिनांक १७.०३.२०१२ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१,००१/-** देणगी दिली.



❊ **कु.प्राजक्ता राजेंद्र घावटे** हिच्या दि.०४.०४.२०१२ च्या वाढदिवसानिमित्त तिचे पिताश्री श्री.राजेंद्र घावटे, रा.जवळे यांनी मंडळास **रू.१,००१/-** देणगी दिली.



❊ पारनेर तालुका मित्र मंडळाचे संस्थापक **अध्यक्ष कै.वामन शंकर भोंग गुरूजी** यांच्या दि.०२.०५.२०१२ रोजीच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सुनबाई श्रीम. मंदाताई विनायक कुलकर्णी यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

❊ **सौ.सुमनताई कृष्णराव औटी व श्री.कृष्णराव दत्तात्रय औटी,** रा. पारनेर यांच्या लग्नाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त तसेच श्री. कृष्णराव औटी यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांचे सुपुत्र प्रो.सुनील व ॲड.सुधाकर यांनी मंडळास **रू.२,१११/-** देणगी दिली.



❊ **प्रा.राजाराम रामभाऊ पागीरे,** रा.पिंपरी पठार यांनी त्यांच्या दि.११.०५.२०१२ रोजीच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



❊ **स्व. बसंतीबाई बन्सीलालजी गांधी** रा.सुपे यांच्या दि.११.०५.२०१२ च्या प्रथम स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.अशोकलालजी यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.



❊श्री. पंढरीनाथ काशिनाथ शेळके रा.हत्तलखिंडी यांनी मातोश्री **कै.सौ.बबईबाई काशिनाथ शेळके** यांच्या दिनांक ०२.०६.२०१२ च्या स्मृती दिना निमित्त मंडळास **रू.५,०००/-** देणगी दिली.



❊ **कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या दि. ०८.०८.२०१२ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. उत्तमचंद रामचंद कर्नावट** रा. खडकवाडी यांनी त्यांचे सुपुत्र **स्व. मनोज** यांच्या दिनांक १०.०८.२०१२ च्या स्मृती दिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.११००/-** देणगी दिली.



❊ प्रा.दिलीप वामन बागूल रा.मांडवे खुर्द यांनी त्यांचे सुपुत्र **चि. विश्वजीत** यांच्या दि.११.४.२०१२ च्या वाढदिवसानिमित्त यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. अनंतराव महादेव मातेरे,** रा. बाभुळवाडे यांनी **जीवन शिक्षण विद्या मंदिर, बाभुळवाडे** या शाळेतील १० गरीब विद्यार्थ्यांना आई-वडिलांच्या स्मरणार्थ **रू.१०,०००/-** देणगी दिली.

# नांदा सौख्य भरे

❊ श्री.बन्सी दगडू औटी, रा.पारनेर यांचे सुपुत्र **चि.प्रशांत** व श्री.सदाशिव कोंडीबा तांबडे रा.अवसरी खुर्द, ता.आंबेगाव यांची सुकन्या **सौ.तृप्ती** यांचा शुभविवाह दि.१५.०६.२०१२ रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.औटी यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.

❊ श्री.शिवाजी विठ्ठल धुमाळ (सर), रा. टाकळी ढोकेश्वर यांची सुकन्या **सौ.विनया** व श्री.केशवराव दगडूजी खानदेशे, रा. अहमदनगर यांचे सुपुत्र **चि.मानस** यांचा शुभविवाह **दि.२७.०६.२०१२** रोजी संपन्न झाला.

❊ श्री.सुरेश लक्ष्मण बेलोटे, रा. देवी भोयरे यांची सुकन्या **डॉ.सौ. शरयु** व श्री. शामराव दशरथ देवरे, रा. जळगाव यांचे सुपुत्र **डॉ. अमोल** यांचा शुभविवाह **दिनांक २७.०६.२०१२** रोजी संपन्न झाला.

❊ श्री.विलास गोविंदराव ढुबे, रा. कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ. माधुरी** व श्री. सदाशिव महादेव धोंगडे रा. कोल्हापुर यांचे सुपुत्र **चि.सुहास** यांचा शुभविवाह **दिनांक ०१.०७.२०१२** रोजी संपन्न झाला.

# भावपूर्ण निरोप



❋ **सौ. इंदुमती शिवाजीराव गावडे (मो.९७६५६१६०४१)**, रा.राळेगण सिद्धी या पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातून ३७ वर्षांच्या सेवेनंतर मुख्याध्यापिका म्हणून **दिनांक ३१.०५.२०११** रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



❋ **श्री. प्रकाशराव बाजीराव घोरपडे (मो.९८२२८१५५६४)**, रा.मंगळापूर, ता.कोरेगाव, जि.सातारा हे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनी, पुणे येथून ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.१८.०५.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.




❋ **श्री. अशोक भीमसिंग पाटील (मो.९७६३६७३०६५)**, रा.वडगाव खुर्द, ता.पाचोरा, जि.जळगाव हे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनी, पुणे येथून ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.२९.०५.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



❋ मंडळाचे कार्यवाहक **श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे (मो.९०११०२१४३०)**, रा.बाभुळवाडे हे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनी, पुणे येथून ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



❋ **श्री.शिवाजी गणपतराव सोमवंशी (९५४५५५१८४८)** हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी पुणे परिमंडल, पुणे मधून सहाय्यक व्यवस्थापक (मानव संसाधन) वर्ग-१ या पदावरून **दि.३१.०५.२०१२** रोजी ३५ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.



❋ **श्री. पांडुरंग विश्वनाथ चाफे, (मो. ९९२२७५८०७०)** रा.साकुरी, ता.राहाता हे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनी पुणे येथून ३८ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.०६.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



❋ **श्री. नविनचंद्र श्रीकिसन नाबरीया, (मो.९३७०१४६८७४)** रा.अहमदनगर हे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनी पुणे येथून ३९ वर्षांच्या सेवेनंतर **दिनांक ३०.०६.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



❋ **श्री. रमेश केशव पोटघन, (मो.९८५०९०९४०८)** रा. जातेगाव हे टाटा मोटर्स कंपनी, पुणे येथून ४० वर्षांच्या सेवेनंतर **दिनांक ३१.०५.२०१२** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५,०००/-** देणगी दिली.



❋ **श्री.पंढरीनाथ काशिनाथ शेळके (मो.९४२३२०४२७५)** रा. हत्तलखिंडी हे वरीष्ठ अधिक्षक डाक विभाग, मुंबई शहर दक्षिण मंडल येथून दि.३०.०६.२०१२ रोजी ३९ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.

## पाऊस



*काळ्या मेघांनी भरून आला, आसमंत सारा।*
*पाठवी किरण लहरी, मधुनच हा सुर्यतारा।*
*जसा निळ्या समुद्राचा, दिसे चंदेरी किनारा।*
*दक्षिण पुर्वेस असे, इंद्रधनुष्याचा आगळा तोरा।*
*भीडे अंगाला हळुच हा रानवारा।*
*हिरवा गालीचा पांघरून, स्तब्ध ही वसुंधरा।*
*किलबीलाट पक्षांचा, शोधिती कुठेतरी आसरा।*
*होई नवलच, जर मोर ना फुलवी त्याचा पिसारा।*
*तळमळती परतीच्या वाटेवर, वासरे जाण्या माघारा।*
*वाट पाहतो मी ही, कधी भिजवतील मला संतत धारा।*


## दिंडी

*सरला अधिक महिना, मेघ दाटले आभाळा।*
*लागले एकादशीचे वेध, वारकरी होऊ लागले गोळा।*
*नाही आमंत्रण कुणाला, तरी चाले अखंड हा दिंडी सोहळा।*
*ध्यास मनी एकच, कधी भेटेन विठु सावळा।*
*जय घोष पांडुरंगाचा मुखी, लावितसे एकमेका लळा।*
*गजर माऊलीचा होत असे अविरत, नाही डोळ्याला डोळा।*
*घुमती टाळ मृदुंगाचे सुर, लावती वेड सकळा।*
*विश्व शांतीचा संदेश घेऊनी, चाले वाट हा संतांचा मेळा।*

**- डॉ.बाळासाहेब बांडे**



# अध्यक्षीय मनोगत



**हौसाराम घोडके**
(कार्याध्यक्ष)

१९७९ साली मोजक्या व्यक्तींच्या उपस्थितीमध्ये मा.भोंग गुरूजींच्या अध्यक्ष्यतेखाली पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणेची स्थापना झाली. कार्यकर्त्यांच्या सर्मपित वृत्तीमुळे व पारनेरकरांच्या प्रगल्भ सामाजिक जाणिवेमुळे मंडळाची वाटचाल जोमाने सुरू झाली. मा.भोंग गुरूजींनी २००२ मध्ये प्रकृतीच्या कारणास्तव अध्यक्षपद सोडले व आम्हा नवीन कार्यकर्त्यांच्या हाती मंडळाची सुत्रे सोपविली. गेली १० वर्षांच्या अथक परीश्रमाचे फळ म्हणजे पारनेर तालुका मित्र मंडळाचे उभे राहीलेले देखणे वसतिगृह. मंडळाने नुसतेच वसतिगृह बांधले नाही तर गेल्या ३० वर्षात अनेक सामाजिक, शैक्षणिक कामे केली आहेत. विद्यार्थ्यांना मदत, पारनेर तालुक्यामध्ये १०वी - १२वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबीरे, आरोग्य शिबीरे यासारखे अनेक उपक्रम यशस्वीरित्या राबविले आहेत. याशिवाय आजारी व गरजू व्यक्तींना मंडळ आर्थिक मदत करते. शिवाय पारनेर तालुका मित्र मंडळामध्ये पारनेर तालुक्यातील २७ ग्रामपंचायतींना लोखंडी तिरड्या देणगी म्हणून दिलेल्या आहेत. मंडळातर्फे मौजे कासारे येथे डेनमार्कच्या नोविब संस्थेच्या मदतीतुन १९८४ मध्ये दोन सार्वजनिक विहीरी खोदल्या आहेत. **पारनेर तालुका मित्र मंडळाने स्वतःची वेबसाईट www.parnermitramandalpune.com चालू करून आधुनिक संपर्क क्षेत्रात प्रवेश केला आहे. या वेबसाईटच्या माध्यमातून सर्व सभासद व हितचिंतकांनी आपल्या मित्रपरीवार व संबंधीतांना मंडळाच्या कार्याची माहिती करून द्यावी ही विनंती.**

व्यक्ती, समाज, संस्था, देश किंवा कुणीही असो त्यास गती असेल तरच पुढे प्रगती होत राहाते. मंडळास गती आलेली आहे. मला असे जाणवले की, संस्था अधिक गतीमान करावयाची असेल तर आतापर्यंत जी मंडळी सर्मपित भावनेने काम करीत आहेत त्यांना योग्य ती संधी मिळालीच पाहिजे. म्हणून जून २०१२ पासून नवीन पदाधिकारी निवडले आहेत. मीसुद्धा कार्यकर्ता म्हणून त्यांच्याबरोबर असणारच. नवीन कार्यकारीणीला माझ्यातर्फे हार्दिक शुभेच्छा !

**हौसाराम घोडके,** कार्याध्यक्ष

# वस्त्रदानासाठी आवाहन !

जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजा आहेत. आपल्या देशातील गरीब, गरजू व आदिवासी भागातील बंधु-भगिनी, मुले यांना वस्त्राच्या कमतरतेमुळे मुख्य प्रवाहात सामील होता येत नाही. महात्मा गांधींना याची सर्वप्रथम जाणीव झाली. ''**जोपर्यंत माझ्या सर्व भारतीयांना अंगभर वस्त्र ल्यायला मिळणार नाही तोपर्यंत मी सुद्धा त्यांच्याप्रमाणेच राहील.**'' अशी त्यांनी प्रतिज्ञा केली. ते आयुष्यभर अर्धवस्त्रावरच राहीले. गेली कित्येक वर्षे मंडळाच्या कामासाठी फिरत असताना जाणवले की, अनेक व्यक्तींकडे सुस्थितीतील अनेक कपडे पडून असतात. परंतु त्याचे काय करावे हे कळत नाही. **पारनेर तालुका मित्र मंडळ 'वस्त्र बँक' सुरू करीत आहे.** कृपया सर्वांनी आपली **नवी/जुनी वस्त्रे, शर्ट, पँट, साडी, आंथरूण, पांघरूण, लहान मुलांचे कपडे गरजू देशबांधवांना देण्याकरीता सढळ हाताने दान करून देशकार्यात आपला खारीचा वाटा उचलावा.**

**कपडे व्यवस्थित, धुतलेले, शिवलेले, बटन लावलेले व इस्त्री केलेले असावेत ही विनंती.**

**वस्त्रदानासाठी खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-**

**१) शाहुनगर, संभाजीनगर, कुदळवाडी विभाग - श्री. सुनील कोल्हे - ९९२२४३४९८६**
**२) भोसरी विभाग - श्री.बाजीराव जगदाळे - ९०११०२१४३०, श्री.सुनील पोटे - ९२२६९२१०८८**
**३) चिंचवड विभाग - श्री.मधुकर शिरोळे - ९९२२१६६१२५**
**४) काळेवाडी, थेरगाव विभाग - श्री.अशोक वाबळे - ९८८१६०८३५७**
**५) चंदननगर, नगर रोड विभाग - श्री.भाऊसाहेब नरड - ९७६७७२५८११**
**६) हडपसर विभाग - प्रा. गोरक्ष जगताप - ९८६०९०७६१८**
**७) पुणे विभाग - श्री. हौसाराम घोडके - ९४२०६९६७९०**
**८) सांगवी, पिंपळे गुरव विभाग - श्री.बाळासाहेब येणारे - ९९२२९६४८२५**

**याशिवाय मंडळाच्या वसतिगृहावर सुद्धा कपडे स्विकारले जातील.**



## -: कर्तृत्व पारनेरकरांचे :-

# डॉ. बाळासाहेब बांडे - एक परिपूर्ण व्यक्तीमत्व

डॉ. बाळासाहेब बांडे यांचे नाव पारनेर तालुक्यात माहीत नाही अशी व्यक्ती सापडणे फार कठीण. कुठलाही आजार असो, प्रत्येकाला डॉक्टरांची आठवण येतेच. डॉक्टर सुद्धा न थकता व न चुकता प्रत्येकास विनामूल्य योग्य ते मार्गदर्शन करतात. त्यामुळेच ते सर्वांना हवेहवेसे वाटतात. डॉक्टरांचे मूळ गाव टाकळी ढोकेश्वर. तेथेच त्यांचा जन्म व तिसरीपर्यंतचे शिक्षण झाले. डॉक्टरांचे वडील दगडू रामभाऊ बांडे व चुलते धोंडीभाऊ हे टाकळीमध्येच बारांगणी नावाच्या विभागात खिलारी पाटील यांच्या शेतावर सालकरी गडी म्हणून काम करीत असत. त्याचबरोबर **ते विहीर खणण्याची मजुरी देखील करीत असत.** आज गावातल्या ज्या काही पूर्वीच्या विहीरी आहेत त्या सर्व खोल विहीरी खणण्याच्या कामात त्यांचा सहभाग होता. अतिशय कष्टात आणि हलाखीत असणाऱ्या या कुटुंबात त्यांचे वडील व दोन्ही चुलते वेगवेगळ्या कारणामुळे अकाली निधन पावले. त्यामुळे त्यांना तसे वडीलधाऱ्यांचे आर्थिक व मानसिक पाठबळ मिळाले नाही.

परंतु विलक्षण बुद्धीमत्ता व कष्ट करण्याची ताकद डॉक्टरांच्या मध्ये उपजतच होती. साडेचार वर्षांचे असतानाच त्यांना आईवडीलांनी शाळेत घातले. त्यांची आजी श्रीमती पार्वतीबाई जिला 'पाराई' म्हणून संबोधत असत, दररोज पाटकुळी घेऊन शाळेत सोडत व आणीत असत. डॉक्टरांना त्यांच्या प्रत्येक प्रगतीच्या पायरीवर आजही आजींची प्रथम आठवण येते.

तिसरीपर्यंतचे शिक्षण टाकळी ढोकेश्वर येथेच झाले. त्यानंतर ते आजोळी पारनेर येथे राहावयास आले. ४थी ते १०वी पर्यंतचे शिक्षण जीवन शिक्षण मंदिर पारनेर व न्यू इंग्लिश स्कूल, पारनेर येथे झाले. या काळातील अनेक आठवणी आजही डॉक्टरांना जशाच्या तशा आठवतात. प्राथमिक शिक्षिका सरस्वतीबाई औटी पासून श्री. जी.डी.रोहोकले सरांपर्यंत सर्वांनी त्यांच्या शैक्षणिक जीवनावर पैलू पाडले व त्यांच्या भावी उत्कर्षाचा पाया भक्कम केला. या सर्वांच्या आठवणी त्यांच्या मनावर कायमचा ठसा उमटवून गेल्या. एकदा त्यांना विश्वनाथ खिलारी गुरूजींनी घरी नेऊन **दुध-भाकरी खायला घातली व नंतर ताटात हात धुवून ते पाणी पिण्यास सांगितले. कुठलीही गोष्ट वाया न घालविण्याचा हा मोठा धडा त्यांनी आतापर्यंतच्या आयुष्यात पाळला.** चौथीत असताना श्री.पवार गुरूजी त्यांना अनेकदा त्यांच्या घरी जेवायला घेऊन जात असे. त्याचे सुद्धा त्यांना भयंकर आश्चर्य आणि कुतुहल वाटत असे. अशा सर्वांनीच त्यांचे खूप लाड केले. त्यांनी सुद्धा वर्गात सातत्याने प्रथम क्रमांक मिळवून त्यांच्या प्रेमाला दाद दिली.

**आई अशिक्षीत असली तरी मुलांनी शिक्षणावर लक्ष पूर्ण केंद्रीत करावे याची दूरदृष्टी तिच्याकडे होती.** त्यामुळे तिने कायम भजन, किर्तन, तमाशा, खेळ स्पर्धा, इत्यादी कार्यक्रमात भाग घेण्यापासून परावृत्त केले. बालहट्टाचा किंवा रडण्याचा तिच्यावर काहीच परिणाम होत नसे. **घरची गरीबी इतकी की कॉलेजमध्ये जाईपर्यंत सुद्धा सायकल चालविता येत नव्हती.**

वडिलांच्या अकाली निधनानंतर आईच्या कडक शिस्तीखाली त्यांचे व्यक्तिमत्व घडत होते. तो काळच मोठा कठीण होता. तो काळ १९७१ ते १९७३ चा होता. त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. शारीरिक श्रमाला पर्याय नव्हता. **डॉक्टर सुद्धा रोजगार हमी योजनेच्या कामावर जात असत. शिवाय गुरे सांभाळून, शेण गोळा करणे, गोवऱ्या लावणे, काही मैल लांब असणाऱ्या विहीरीवरून पिण्याचे पाणी आणणे** इत्यादी गोष्टी त्यांच्या सहज अंगवळणी पडल्या. त्यामुळे तर प्रवरानगर येथील पीव्हीपी कॉलेजमधील 'कमवा व शिका' योजनेतील काम असो वा मामाच्या सायकल दुकानात सायकल दुरुस्तीचे काम असो, यात त्यांना कुठलाही संकोच जाणवला नाही. उलट आजही बालपणातील कष्टाचे दिवस आठवून त्यांना कार्यमग्न ठेवण्यात या सर्व गोष्टींचा वाटा आहे असे वाटते.

त्यांच्या जीवनातील एक महत्वाचे वळण म्हणजे प्रवरानगर येथे ११वी मध्ये घेतलेला प्रवेश. तो केवळ **श्री.शंकरराव नरसाळे सर** यांच्या दूरदृष्टीमुळे व आग्रहामुळेच. **श्री.जी.डी. रोहोकले सर** यांनी त्यांना तेथे नेऊन दाखल केले. सदर कॉलेज ग्रामीण विभागात नुकतेच सुरू झालेले होते व र्सव शिक्षक वर्गही ग्रामीण भागातील होता. घरची कुठलीही मदत नसताना तेथे त्यांना 'कमवा व शिकवा' या योजनेचा लाभ मिळणार होता. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्तीमधून कॉलेजमधील खाणावळीचा खर्च घेऊन उपप्राचार्य श्री.नवले सरांनी त्यांना 'कमवा व शिकवा' योजनेत काम न करण्याची सवलत दिली. त्यामुळे त्यांना अभ्यासासाठी जास्त वेळ देता आला. तेथील सर्व तळमळीच्या शिक्षकांच्यामुळे त्यांनी १०वीत मिळविलेला प्रथम क्रमांक, १२वीत शास्त्र शाखेत सुद्धा कायम ठेवला.

१९७९ मध्ये त्यांना गुणवत्तेवर बी.जे.मेडीकल कॉलेज येथे प्रवेश मिळाला. खरे म्हणजे कुठलीही आर्थिक परिस्थिती नसतानासुद्धा त्यांच्या दृष्टीने फार मोठे आव्हान होते. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती व महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या संत ज्ञानेश्वर वसतिगृहातील प्रवेशामुळेच त्यांनी ते आव्हान यशस्वीपणे पेलले.

याच सुमारास पुण्यामध्ये पारनेर तालुका मित्र मंडळ सुरू झाले. **मंडळाकडून सुद्धा त्यांना आर्थिक मदत मिळत असे. त्याहीपेक्षा मंडळामुळे जी सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली ती फार मोलाची ठरली.** त्यामुळेच आज अनेक सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक संघटनांच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळाली. संत ज्ञानेश्वर वसतिगृहामुळे त्यांच्या आयुष्याला दुसरी कलाटणी मिळाली. त्यामुळे त्यांना शेकडो विद्यार्थ्यांना शिकविण्याची संधी मिळाली. आजही देशात इतरत्र व परदेशात असलेले त्यांचे विद्यार्थी त्यांचे नियमितपणे मार्गदर्शन घेतात. गेली २५ वर्षे ते या रुग्णालयाशी निगडीत आहेत. या खाजगी पण सेवाभावी रुग्णालयात काम करताना पारनेर व नगर भागातील अनेक रुग्णांना योग्य प्रकारचे उपचार करून देण्यात व अडचणी सोडविण्यात त्यांना विलक्षण आनंद होतो. प्राथमिक तपासणीसाठी आलेल्या सर्वच रूग्णांना ते मोफत सेवा देतात. दररोज १४ ते १६ तास काम करताना त्यांचा बराचसा वेळ केईएम रूग्णालयात जातो. म्हणूनच डॉक्टर म्हणतात की, 'हे माझे दुसरे घरच आहे. माझे जीवन परीपूर्ण होण्याच्या प्रक्रियेत या रूग्णालयाचा फार मोठा वाटा आहे.'




**आमदार विजयराव औटी यांचे हस्ते सत्कार स्विकारताना डॉ.बाळासाहेब बांडे**

अनेक मित्र मिळाले व तेथेच अन्यायाविरुद्ध दाद मागण्याची शक्ती व इच्छा मनात निर्माण होण्याची मानसिकता तयार झाली.

१९८४ साली एम.बी.बी.एस. झाल्या-नंतर १९८७ साली त्यांनी **एम.डी. (ॲनेस्थेशिया)** बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात **प्रथम क्रमांक** मिळवून पूर्ण केले. त्यानंतर ते १९९१ मध्ये **एम. डी. (मेडीसीन)** सुद्धा झाले. खरे म्हणजे अशा द्विपदवीधर व्यक्ती पुण्यामध्ये फारच थोड्या आहेत. पण याचा कुठेही त्यांनी बडेजावपणा केला नाही. तरीसुद्धा त्यांची शैक्षणिक भूक भागली नाही. नंतर त्यांनी कायद्यातील दोन पदविका, इंटेसीव्ह केअरमधील **युरोपीयन पदविका** हा अभ्यासक्रम पूर्ण केला. अजुनसुद्धा त्यांना शिकायचे होते. परंतु ते आता हे सर्व ज्ञान त्यांच्या विद्यार्थ्यांना देवून आपली शैक्षणिक ओढ पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. एम.डी.मेडीसीन केल्यानंतर पारनेरला जाऊन हॉस्पीटल काढण्याचा त्यांचा मानस होता. परंतु त्यांचे काही शिक्षक व सिनीयर डॉक्टर्स यांच्या आग्रहामुळे ते के.ई.एम.हॉस्पिटलमध्ये कन्सल्टंट म्हणून रुजू झाले. तेथेच

या सर्व जबाबदाऱ्या सांभाळताना डॉक्टरांनी त्यांच्या व्यावसायिक संघटनात्मक कामात लक्ष घातले. डॉ.बाळासाहेब बांडे यांना फेब्रुवारी २०१२ मध्ये झालेल्या पदवीदान समारंभामध्ये 'फेलो ऑफ इंडियन कॉलेज ऑफ क्रिटीकल केअर मेडीसीन' या फेलोशिपने गौरविण्यात आले आहे. आतापर्यंत हा गौरव भारतामध्ये फक्त २५ डॉक्टरांना प्राप्त झाला आहे. इंडियन सोसायटी ऑफ क्रिटीकल केअर या देशातील ५००० सदस्य असलेल्या संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारीणीवर ते सलग १० वर्षे निवडून आले. क्रिटीकल केअर डिप्लोमाचा शिक्षक, परीक्षक व मुख्य परीक्षक होण्याचा



पद्मभूषण डॉ.अण्णासाहेब हजारे यांचे समवेत डॉ.बाळासाहेब बांडे

राष्ट्रीय स्तरावरील बहुमान त्यांना मिळाला. इंडियन सोसायटी ऑफ अनेस्थेजिऑलॉजी या राष्ट्रीय स्तरावरील संघटनेच्या महाराष्ट्र विभागाचे ते गेली १० वर्षे कार्यकारणी सभासद आहेत. या संघटनेच्या पुणे शाखेला गेली ३ वर्षे सतत मिळणाऱ्या पुरस्कारामुळे केलेल्या कामाची पावती त्यांना मिळाली.

अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ पुणे या संस्थेचे ते सक्रीय सभासद आहेत.

पारनेर तालुका मित्र मंडळ पुणे या संस्थेच्या कार्यामध्ये १९९४ पासून ते नियमितपणे भाग घेतात. **त्यांच्या व प्रा.दिलीप बागुल यांच्या विचारमंथनातून 'संवाद' या मासिकाचा उदय झाला.** त्यामुळे तालुक्यातील प्रत्येकाशी संपर्क वाढला गेला. त्यांनी पारनेर तालुका मित्र मंडळाचे सेक्रेटरी व कार्यवाहक म्हणून काम केले आहे. मंडळाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयात त्यांचा सहभाग असतो.

हे सर्व करीत असताना त्यांना त्यांच्या संपूर्ण कुटुंबाकडून विशेषतः पत्नी डॉ.सौ.सरोज यांच्याकडून प्रोत्साहन व सहकार्य कायमच मिळत राहीले. त्यामुळेच डॉक्टरांना या सर्व सामाजिक कामात समरसून भाग घेता आला. डॉक्टर सरोज या सुद्धा एम.डी.आहेत. त्या रोटरी क्लबच्या सदस्या असून त्यांची रोटरी क्लब ऑफ पुणे सेंट्रलच्या वार्षिक पदग्रहण कार्यक्रमामध्ये डायरेक्टर (नॉन मेडीकल प्रोजेक्टस्) म्हणून २०१२-२०१३ साठी निवड झाली आहे. तसेच त्यांना 'बेस्ट न्यू रोटरीयन ऑफ दी इयर' हा विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. याशिवाय युथ सर्व्हिसेस प्रोजेक्टमध्ये केलेल्या कामाबद्दल सुद्धा त्यांचा सत्कार करण्यात आलेला आहे. तसेच त्या उत्तम गायीका आहेत. गंधर्व महाविद्यालयातून त्यांनी मास्टर डिग्री घेतलेली आहे. डॉक्टरांची मुलगी कु.ऋतुजा ही इंजिनियरींग कॉलेजमध्ये प्रथम वर्षात असून एनव्हारनमेंटल इंजिनियर होण्याचा तिचा मानस आहे. कु.ऋतुजा हिची रोटरॅक्ट क्लब ऑफ शनिवार वाडा २०१२-२०१३ साठी सेक्रेटरी म्हणून निवड झाली आहे. तसेच धाकटी मुलगी कु.श्वेता ही नुकतीच १०वी पास झाली आहे. दोघींनाही वडिलांच्या सामाजिक कामाचा अभिमान आहे.

लोकसंग्रह करण्याची डॉक्टरांना आवड आहे. सर्व सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक कामासाठी आवश्यक असलेले शारीरिक व मानसिक संतुलन त्यांना लाभलेले आहे. सध्या ते के.ई.एम.हॉस्पिटल, पुणे मधील मेडीसीन, अनेस्थिशिया व इंटेसीव्ह केअर या तिन्ही विभागात सिनीअर कन्सल्टंट म्हणून यशस्वीपणे काम करीत आहेत.

पारनेर तालुका मित्र मंडळाच्या जून महिन्याच्या कार्यकारीणी सदस्यांच्या सभेमध्ये डॉक्टरांची **पारनेर तालुका मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.** त्यांच्या मार्गदर्शनाखाली पारनेर तालुका मित्र मंडळाची भरभराट होवो अशी अपेक्षा व्यक्त करतो.

संकलक - सुनील पोटे



**आ.विजयराव औटी यांचे हस्ते 'पारनेर भूषण' पुरस्कार स्विकारताना डॉ.बाळासाहेब बांडे व डॉ.सौ.सरोज बांडे.**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०११ ते ३१.०३.२०१२ अखेरचे

| जमा | रुपये | खर्च | रुपये |
|---|---|---|---|
| | | बँक चार्जेस | १,१६५.२९ |
| **आरंभीची शिल्लक** | | वार्षिक सभा व समारंभ | ३६,७३५.०० |
| रोख | ६८७.०० | देखभाल व दुरुस्ती | १५,११२.०० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ७९,४९८.०० | शैक्षणिक मदत | ३,०००.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | १,९३,६३९.०० | वैद्यकीय मदत | ३,०००.०० |
| सुवर्णयुग सहकारी बँक | २,२८,८९५.०६ | साफसफाई खर्च | ७,४६९.०० |
| | | वॉचमन पगार | ४५,७००.०० |
| | | मानधन | ४०,०००.०० |
| बचत ठेव व्याज खाते | ३६,९२९.०० | टपाल | २,२१०.०० |
| इमारत निधी खाते | १२,०६,९०१.०० | प्रवास | १२,७७०.०० |
| | | लिहिणावळ | ७,५००.०० |
| होस्टेल फी | ३,८२,२३०.०० | ऑडिट फी | ५,०००.०० |
| फॉर्म फी | ३,६२५.०० | लिगल फी | १,०००.०० |
| टी.डी.एस.वरील व्याज | ८९५.०० | प्रोफेशनल चार्जेस | ५,०००.०० |
| | | झेरॉक्स | १,४३७.०० |
| होस्टेल डिपॉझीट | १,१४,०००.०० | वीज बील | १,१६,९३०.०० |
| | | जाहिरात | १,४००.०० |
| टि.डी.एस. २००९-२०१० | १६,२०५.०० | सभा खर्च | ६४५.०० |
| | | किरकोळ | ३,६२१.०० |
| अनामत - | | प्रॉपर्टी टॅक्स | ४७,७९५.०० |
| श्री.हौसाराम घोडके | १००.०० | इलेक्ट्रिकल फिटींग | १९,१२४.०० |
| | | स्टेशनरी | ६,५८८.०० |
| | | छपाई | ३५,१३५.०० |
| | | होस्टेल फी | ६,०००.०० |
| | | टेंडर डिपॉझीट | ४,६५९.०० |
| | | होस्टेल डिपॉझीट | ५९,५००.०० |
| | | सिक्युरिटी डिपॉझीट | ३१,३९२.०० |
| | | **मालमत्ता खर्च -** | |
| | | फर्निचर व फिक्चर | ५६,१८१.०० |
| | | **अखेरची शिल्लक -** | |
| | | रोख | १५.०० |
| | | बँक ऑफ महाराष्ट्र | २,९२,३१९.०० |
| | | स्टेट बँक ऑफ इंडिया | १०,३१,९२५.०० |
| | | सुवर्णयुग सहकारी बँक | ३,६३,२७६.७७ |
| **एकूण रुपये** | **२२,६३,६०४.०६** | **एकूण रुपये** | **२२,६३,६०४.०६** |

| सुनील पोटे | मधुकर शिरोळे | डॉ.बाळासाहेब बांडे | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०११ ते ३१.३.२०१२ अखेरचे

| खर्च | रुपये | जमा | रुपये |
|---|---|---|---|
| बँक चार्जेस | १,१६५.२९ | | |
| वार्षिक सभा व समारंभ | ३६,७३५.०० | बचत ठेव व्याज खाते | ३६,९२९.०० |
| देखभाल व दुरुस्ती | १५,११२.०० | होस्टेल फी | ३,७६,२३०.०० |
| शैक्षणिक मदत | ३,०००.०० | फॉर्म फी | ३,६२५.०० |
| वैद्यकीय मदत | ३,०००.०० | टी.डी.एस.वरील व्याज | ८९५.०० |
| साफसफाई खर्च | ७,४६९.०० | | |
| वॉचमन पगार | ४५,७००.०० | | |
| मानधन | ४०,०००.०० | | |
| टपाल | २,२१०.०० | | |
| प्रवास | १२,७७०.०० | | |
| लिहिणावळ | ७,५००.०० | | |
| ऑडिट फी | ५,०००.०० | | |
| लिगल फी | १,०००.०० | | |
| प्रोफेशनल चार्जेस | ५,०००.०० | | |
| झेरॉक्स | १,४३७.०० | | |
| वीज बील | १,१६,९३०.०० | | |
| जाहिरात | १,४००.०० | | |
| सभा खर्च | ६४५.०० | | |
| किरकोळ | ३,६२१.०० | | |
| प्रॉपर्टी टॅक्स | ४७,७९५.०० | | |
| इलेक्ट्रिकल फिटींग | १९,१२४.०० | | |
| स्टेशनरी | ६,५८८.०० | तोटा ताळेबंदास वर्ग | ६७,४२२.३९ |
| छपाई | ३५,१३५.०० | | |
| **एकुण रूपये** | **४,१८,३३६.२९** | | |
| घसारा | ६६,७६५.१० | | |
| **एकूण रुपये** | **४,८५,१०१.३९** | **एकूण रुपये** | **४,८५,१०१.३९** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **डॉ.बाळासाहेब बांडे** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०१२ अखेरचे

| जिंदगी व देणी | रुपये | रुपये |
|---|---|---|
| **ट्रस्ट निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० |
| **इतर निधी** | | |
| **इमारत निधी** | | ९३,४५,६८९.०३ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ८१,३८,७८८.०३ | |
| अधिक जमा चालु वर्षी | १२,०६,९०१.०० | |
| **शैक्षणिक फंड** | | ९६,७२५.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | |
| **अंत्यविधी जमा निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० |
| **टेंडर डिपॉझिट** | | ००.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ४,६५९.०० | |
| वजा – चालू वर्षी | ४,६५९.०० | |
| **सिक्युरिटी डिपॉझीट** | | ००.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ३१,३९२.०० | |
| वजा – चालू वर्षी | ३१,३९२.०० | |
| **होस्टेल डिपॉझीट** | | ६४,५००.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १०,०००.०० | |
| अधिक – जमा चालू वर्षी | १,१४,०००.०० | |
| वजा – चालू वर्षी | – ५९,५००.०० | |
| अनामत चालु वर्षी – श्री.हौसाराम घोडके | | १००.०० |
| **एकूण रुपये** | | **९७,१०,४३०.०३** |

| स्थावर मालमत्ता व येणी | रुपये | रुपये |
|---|---|---|
| **स्थिर मालमत्ता -** | | |
| **जमीन खरेदी** -मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८,४५,३११.०० |
| **इमारत बांधकाम** - मागील ताळेबंदाप्रमाणे | | ६३,०३,५०५.०० |
| **बोअरवेल** - मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०५०.०० |
| **मोटारपंप** - मागील ताळेबंदाप्रमाणे | | २४,१६५.०० |
| **फर्नि.व फिक्चर -** | | ६,२१,३४१.९० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ६,३१,९२६.०० | |
| चालु वर्षी वाढ | ५६,१८१.०० | |
| | ६,८८,१०७.०० | |
| वजा घसारा – १० | – ६६,७६५.१० | |
| **वृक्ष संवर्धन ठेव** – मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,०००.०० |
| **एम.एस.ई.बी.डिपॉझिट** – मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| **टि.डी.एस.- सन २००६-२००७ -** | | ००.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ६४३.०० | |
| वजा – ठराव क्र. २ नुसार जमा | ६४३.०० | |
| **टि.डी.एस.- सन २००९-१०** | | ००.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १६,२०५.०० | |
| वजा – जमा चालू वर्षी | १६,२०५.०० | |
| **उत्पन्न खर्च खाते** | | १,९९,५२१.३६ |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,३१,४५५.९७ | |
| अधिक – तोटा चालु वर्षी | ६७,४२२.३९ | |
| अधिक– ठराव क्र.२ –२००६–०७ टीडीएस. | ६४३.०० | |
| **अखेरची शिल्लक -** | | १६,८७,५३५.७७ |
| रोख | १५.०० | |
| सुवर्णयुग सह.बँक | ३,६३,२७६.०० | |
| स्टेट बँक | १०,३१,९२५.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र | २,९२,३१९.०० | |
| **एकूण रुपये** | | **९७,१०,४३०.०३** |

| सुनील पोटे | मधुकर शिरोळे | डॉ.बाळासाहेब बांडे | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## कार्यकारिणी



**हौसाराम घोडके**
(कार्याध्यक्ष)



**डॉ.बाळासाहेब बांडे**
(अध्यक्ष)



**इंजि.विजयकुमार ठुबे**
(अध्यक्ष,बां.स.)



**मधुकर शिरोळे**
(उपाध्यक्ष)



**सुनील पोटे**
(सेक्रेटरी)



**प्रा.गोरक्ष जगताप**
(सहसेक्रेटरी)



**बाजीराव जगदाळे**
(कार्यवाहक)




**अशोक वाबळे**
(सहकार्यवाहक)



**सखाराम गागरे**
(सदस्य)



**मुरलीधर चौधरी**
(सदस्य)



**भाऊसाहेब नरड**
(सदस्य)



**बाळासाहेब येणारे**
(सदस्य)



**रामदास शिर्के**
(सदस्य)




**सुनील कोल्हे**
(सदस्य)



**तारकराम झावरे**
(सदस्य)



**काशीनाथ गायकवाड**
(सदस्य)




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु झाले असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु झाले आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.


संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५


Website :
http://www.parnermitramandalpune.com/


पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे.
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.- ९४२०६९६७९०



ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.सुनील कुंडलीक पोटे व मुद्रक श्री.सुनील मुरलीधर तोटे (tsunil9657@gmail.com) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________